महावितरण
CIN : U40109MH2005SGC153645

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

दुरध्वनी क्र. : २६४७४२११/२६४७२१३१
वि.क्र. २३३७
(०२२) २६४७१३१० (वै.)

E-mail : gmp@mahadiscom.in

"प्रकाशगड", ४ था मजला,
अनंत काणेकर मार्ग,
स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

---

मावक/ फा.क्र. ५२/२०१६ /१७४२५ दिनांक : ३०/०५/२०१६

प्रति,

**मुख्य अभियंता (वितरण), सर्व क्षेत्रिय कार्यालये.**

विषय : आरक्षणाची पदे थेट व पदोन्नतीद्वारे भरण्यापुर्वी बिंदू नामावली नोंदवही तपासणीबाबत.

मागासवर्गीय कक्ष धारावी, मुंबई, महावितरण या कार्यालयाने सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्गीय कक्ष, मंत्रालय, मुंबई यांचेकडून वेतनगट १ व २ मधील पदांसंदर्भात आणि वेतनगट ३/४ मधील पदांसंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडून बिंदू नामावली नोंदवही तपासणी करून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. परंतु असे निदर्शनास आले आहे की, अद्यापपर्यंत सर्व कार्यालयांनी बिंदू नामावली नोंदवही अद्यावत करुन त्या तपासून घेतलेल्या नाहीत.

२. प्रशासकीय परिपत्रक क्र.५२२, दि.०५.११.२०१५ अन्वये निर्गमित केलेल्या सुचनेनुसार संबंधीत सक्षम प्राधिकारी व नियुक्ती अधिकारी यांनी बिंदू नामावली नोंदवही अद्ययावत करुन शासनाच्या सक्षम अधिका-यांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. तपासणी अभावी पदस्थापना करणे शक्य न झाल्यास संबंधित आस्थापना प्रमुखांवर त्याची जबाबदारी राहील.

३. महाराष्ट्र शासनाचा सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी- २०१५/ प्र.क्र.१२६A/ १६-ब, दि.५ मे २०१५ नुसार दिलेल्या सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करावी. क्षेत्रिय कार्यालयांनी बिंदू नामावली नोंदवहया विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयांकडून तपासून घेण्याचे निर्देश यापूर्वीच दिलेले असल्याने वेतनगट- ३ व ४ (मंडळ व विभाग स्तरावरील जेष्ठता यादी) मधील बिंदू नामावली प्रमाणीत करण्यासाठी संबंधीत विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**( नीलेश गटणे)**
**कार्यकारी संचालक (मासं)**

प्रत रवाना : १) मुख्य महाव्यवस्थापक (मासं /तां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., बांद्रा, मुंबई.
२) उप महाव्यवस्थापक (तां.आस्था./अं.तां.आस्था.), म.रा.वि.वि.कं.मर्या., बांद्रा, मुंबई.